**उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळाच्या अधिपत्याखालील ग्रामीण रुग्णालय, कडेगांव, जि.सांगली येथील २५ अस्थाई पदे पुढे चालू ठेवण्याबाबत.**

# महाराष्ट्र शासन

## सार्वजनिक आरोग्य विभाग

## शासन निर्णय क्रमांकः अपदे-२०१८/प्र.क्र.१२०/आरोग्य-४

१० वा मजला, संकुल इमारत,
गो.ते. रुग्णालय आवार, मुंबई-४०० ००१.
तारीख: २७ एप्रिल, २०१८.

वाचा

1. **सहसंचालक, आरोग्य सेवा, (रुग्णालये-राज्यस्तर), मुंबई यांचे पत्र, क्र.संआसे/कक्ष-३/टे-५अ/वरुगांधीनगर/अपदे/३६७७-७८/१८, दि.२१.०४.२०१८.**
2. **शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांकः अपदे-२०१७/प्र.क्र.२३/आरोग्य-४, दि.०५.०२.२०१८.**
3. **शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांकः पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.५.०३.२०१८.**

शासन निर्णय

उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळाच्या अधिपत्याखालील ग्रामीण रुग्णालय, कडेगांव, जि.सांगली येथील २५ अस्थाई पदांना संदर्भाधीन क्रमांक २ येथील दि.०५.०२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये दि.१.०१.२०१८ ते दि.२८.०२.२०१८ या कालावधीपर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

२. या शासन निर्णयान्वये उपसंचालक, आरोग्य सेवा, अधिपत्याखालील ग्रामीण रुग्णालय, कडेगांव, जि.सांगली येथील यासोबत जोडलेल्या विवरणपत्र “अ” मध्ये नमूद केलेल्या २५ अस्थाई पदांना खालील अटींच्या अधीन राहून दि.१.०३.२०१८ ते दि.३०.०९.२०१८ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात येत आहे.

1. उपरोक्त पदांपैकी कोणतेही पद ६ महिन्यापेक्षा जास्त काळ रिक्त नाही व ज्या कारणांसाठी पदे मंजूर केली आहेत त्या अटी व शर्तीचे पालन करण्यात आले आहे.
2. शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक-पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.०५.०३.२०१८ नुसार विहित करण्यात आलेल्या अटी व शर्तीचे कटाक्षाने पालन करण्यात यावे व त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. त्याचप्रमाणे कार्यालयाचा पदविषयक सुधारित आकृतिबंध उच्चस्तरीय समितीकडून अंतिमत: मान्य करुन घेण्याबाबत तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.
3. विहीत मुदतीत पदांच्या आढाव्याची कार्यवाही पूर्ण न झाल्यास अस्थायी पदांना त्या पुढील कालावधीसाठी मुदतवाढ न मिळाल्यास व त्यामुळे अधिकारी / कर्मचारी यांच्या वेतन व भत्ताचा प्रश्न निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांची राहील.

सदर पदांवरील होणारा खर्च, मागणी क्र.आर-१, "२२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०६-सार्वजनिक आरोग्य, ००१- संचालन व प्रशासन, (०१) (०८) प्राथमिक आरोग्य केंद्राचा ग्रामीण रुग्णालय इतका दर्जा वाढविणे. (२२१० ०४१३)" या लेखाशिर्षाखाली सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरीता मंजुर झालेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय वित्त विभाग, क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.०५.०३.२०१८ अन्वये प्रशासकीय विभाग प्रमुखांना प्रदान केलेल्या अधिकारात निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४२६१६२६२१९०१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pradip M Balkavde

Digitally signed by Pradip M Balkavde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8db6aab31faca2f1a89698a28c94703436c07cda664672d20607766dc59d345b, serialNumber=ed0fa40788bb5c0d7f76b869fa2e5835af215c6a80eae8f70eaf87b0cf68d63f, cn=Pradip M Balkavde
Date: 2018.04.27 12:36:55 +05'30'

**(प्र.मो.बलकवडे)**
अवर सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग,
महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. महालेखापाल, १/२,महाराष्ट्र (लेखा व लेखा परिक्षा) (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर.
२. आयुक्त, आरोग्य सेवा तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
३. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
४. सहसंचालक, आरोग्य सेवा, प्रा.आ.केंद्र (जि.प.स्तर), मुंबई.
५. उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर.
६. सहसंचालक, आरोग्य सेवा ( अर्थ व प्रशासन ), पुणे.
७. सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा ( लेखा व लेखापरिक्षा ), पुणे.
८. जिल्हा शल्य चिकित्सक, सांगली
९. जिल्हा कोषागार अधिकारी, सांगली
१०. जिल्हा आरोग्य अधिकारी, सांगली
११. वित्त विभाग ( व्यय-१३, अर्थसंकल्प-१९ ), मंत्रालय, मुंबई.
१२. अवर सचिव ( सेवा-२/ सेवा-३ / अर्थसंकल्प ), सा.आ.वि., मंत्रालय, मुंबई.
१३. निवडनस्ती ( आरोग्य- ४ ).

## " अ "

### कोल्हापूर मंडळातील ग्रामीण रुग्णालय कडेगांव, जि.सांगली येथिल अस्थाई पदे सन २०१७-२०१८ या वर्षाकरिता पुढे चालू ठेवण्याबाबतचा प्रस्ताव

| अ.क्र. | तात्पुरत्या जागा प्रथमतः ज्या शासन निर्णयवये निर्माण झाल्या तो शासन निर्णय क्र. व दिनांक. | पदनाम. | पदांची संख्या. | वेतन श्रेणी. | ज्या शासकिय आदेशान्वये शेवटी पदे चालू ठेवण्यात आली तो शासन निर्णण क्रमांक व दिनांक | ज्या तारखेपासून पदे पुढे चालू ठेवायची आहे तो दिनांक | लेखाशिर्ष | पदे पुढे चालू ठेवण्याबाबतचे स्पष्टीकरण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग शा.नि.क्र. ग्रारुस्था/२२५१/०८ आरोग्य-४ दि.३०.१२.२०१० | वैद्यकीय अधिक्षक वर्ग१ | १ | १५६००-३१९०० | शासन निर्णय क्रमांक अपदे-२०१८/प्र.क्र २३/आरोग्य -४ दि ०५/०२/२०१८ | दि ०१/०३/२०१८ ते २८/०२/२०१९ | २२१० वैद्यकिय आणि सार्वनिक आरोग्य ०६ सार्वजनिक आरोग्य ००१ संचालनालय व प्रशासन (०१) (०८) प्रा.आ.केंद्रांचा ग्रामिण रुग्णालया इतका दर्जा वाढविणे (२२१००४१३) | ग्रामीण भागामध्ये आरोग्य सुविधा पुरविण्या करिता पदे चालू ठेवणे आवश्यक आहे. |
| | | वैद्यकिय अधिकारी वर्ग२ | ३ | १५६००-३१९०० | | | | |
| | | अधिपरिचारीका वर्ग३ | ७ | ९३००-३४८०० | | | | |
| | | क्ष-किरण तंत्रज्ञ वर्ग३ | १ | ९३००-३४८०० | | | | |
| | | प्रयोगशाळा तंत्रज्ञ वर्ग३ | १ | ९३००-३४८०० | | | | |
| | | सहाय्यक अधिक्षक वर्ग३ | १ | ९३००-३४८०० | | | | |
| | | कनिष्ठ लिपिक वर्ग३ | १ | ५२००-२०२०० | | | | |
| | | लिपिक टंकलेखक वर्ग३ | १ | ५२००-२०२०० | | | | |
| | | औषधनिर्माता वर्ग३ | १ | ५२००-२०२०० | | | | |
| | | प्रयोगशाळा सहाय्यक वर्ग३ | १ | ५२००-२०२०० | | | | |
| | | शिपाई वर्ग४ | १ | ४४४०-७४४० | | | | |
| | | कक्षसेवक वर्ग-४ | ४ | ४४४०-७४४० | | | | |
| | | सफाईगार वर्ग४ | २ | ४४४०-७४४० | | | | |
| | | एकूण | २५ | | | | | |